रावते, दिलीप कोल्हटकर. रंगभूमीवरच्या अनेक गुणी आणि अभिनयसंपन्न कलाकारांसमवेत मी अनेक नाटकातून अभिनय केला. उदा. प्रभाकर पणशीकर, चित्तरंजन कोल्हटकर, काशिनाथ घाणेकर, भालचंद्र पेंढारकर, छोटा गंधर्व, प्रकाश घांग्रेकर, प्रसाद सावकार, डॉ.श्रीराम लागू, विक्रम गोखले, सुधा करमरकर, मा.दत्ताराम, मधुकर तोरडमल, रामदास कामत, रमेश भाटकर आणि पु.ल.देशपांडे.

प्रतिथयश नाट्यसंस्था, दिग्गज दिग्दर्शक आणि प्रतिभावान सहकलावंत यांच्या परीसस्पर्शानं माझी अभिनयकला उजळून निघाली. मी कीर्तीवंत झाले.

## व्यावसायिक (संगीत) नाटक

माझे पहिले संगीत नाटक 'गीत गाईले आसवांनी' हे होते. या नाटकाचे परीक्षण सर्वश्री वा.य.गाडगीळ आणि राजा कारळे यांनी असे केले होते. ते पुढीलप्रमाणे.... 'ती आली, तिने पाहिले व तिने जिंकले !'

त्यानंतर मी 'मत्स्यगंधा' या नाटकात काम केले. तेही आधीचे ७०० प्रयोग झाल्यानंतर. त्यातील मत्स्यगंधेची भूमिका आशालता वाबगावकरांनी गाजवली होती. त्यामुळे त्या भूमिकेत छाप टाकणे हे खरं तर खूप अवघड होते. कारण, First impression is the last impression असते. परंतु मी जिवापाड श्रम घेऊन माझ्या पद्धतीने, माझ्या विचाराने 'मत्स्यगंधा' साकार केली. ती साकार करण्यासाठी मला मा.दत्तारामबापू आणि रामदास कामत यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्यानंतर 'लेकुरे उदंड झाली' या संगीतिकेत काम करण्याचे भाग्य मला लाभले. या दोन्ही नाटकाला संगीत दिले होते प्रतिभाशाली संगीतकार जितेंद्र अभिषेकी यांनी.

ज्या नाटकामुळे मी रसिकांच्या मनावर खऱ्या अर्थाने आधिराज्य गाजविले ते नाटक म्हणजे 'कट्यार काळजात घुसली', 'कट्यार' बद्दल मी काय लिहू? 'कट्यार हा संगीत नाटकातला एक हिरा आहे. ज्याला पैलू पाडले होते ते पुरुषोत्तम दारव्हेकर, वसंतराव देशपांडे आणि जितेंद्र अभिषेकी यांनी.

मी गर्वाने नाही पण अभिमानाने सांगू इच्छिते की 'वीज म्हणाली धरतीला' या नाटकात मी साकार केलेल्या 'जुलेखा' या पात्रामुळे मला एक अभिनयकुल